पोलीस स्टेशन वैजापूर जि. औरंगाबाद (ग्रामीण)

I.O.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** वैजापूर **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0319 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/10/2020 19:24 बजे

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 07/10/2020
**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/10/2020
**Time From (वेळेपासून):** 11:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:55 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 07/10/2020 **Time (वेळ):** 19:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 043 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/10/2020 18:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 22 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलखेड ,वैजापुर ता वैजापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नंदकिशोर पंढरीनाथ धनाड

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड **)**

| **S.No.(अ.** | **Id Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **Id Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पालखेड,वैजापुर ,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पालखेड,वैजापुर ,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8080271619

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जगदीश पुरुषोत्तम मुदीराज | | | 1. गंगापुर रोड साई कॉलणी ,वैजापुर , वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | प्रविण नवनाथ शिंदे | | | 1. प्रमीलाताई मंगलकार्याचे पाठीमा,शिवाराई रोड वैजापुर,वैजापूर,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराचे सहा चलणी नोटा | 3,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 3,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद वैजापूर, जि. औरंगाबाद.दि. 07/10/2020मी नंदकिशोर पंढरीनाथ धनाड, वय 31 वर्षे, व्यवसाय शेती, रा. पालखेड, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद. मोबाईल नं. 8080271691.समक्ष फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असून घरात आई प्रयागाबाई पंढरीनाथ धनाड, मोठा भाऊ नामे राजेंद्र पंढरीनाथ धनाड, भावजय, पत्नी व मुलांसह एकत्र कुटुंबी राहतो. मला दोन बहिणी अनुक्रमे 1) सौ. ज्योती बापु शेळके, 2) सौ. कल्पना विष्णू भुसाळ, दोन्ही रा. नेवरगाव, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद असून त्या त्यांच्या सासरी राहतात. आमच्या कुटूंबाची मौजे पालखेड, ता. वैजापूर शिवारात गट नं. 123, गट नं. 115, गट नं. 126, गट नं. 124, गट नं. 74 येथे असलेली शेत जमीन माझे वडील स्व. पंढरीनाथ मुरलीधर धनाड यांच्या नावावर आहे. माझ्या वडीलांचे दिनांक 12/09/2019 रोजी निधन झाले आहे. माझ्या स्वर्गीय वडीलांच्या नावे असलेल्या उपरोक्त प्रमाणे शेत जमीनीचे वारस लावण्यासाठी मी आमच्या गावचे तलाठी श्री जे.पी. मुदीराज, तलाठी सज्जा पालखेड, ता. वैजापूर जि. औरंगाबाद यांना एक आठवडयापुर्वी फोन करुन विचारले असता त्यांनी सांगीतले की, तुम्ही शेतजमीनीचे वारस लावण्यासाठी 1) नोटराईज शपथपत्र, 2) शेत जमीनीचे 7/12 उतारे, 3) वडीलांचे मृत्यपत्र तसेच 4) वारस प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे घेवून या. त्यानंतर तलाठी श्री जे.पी. मुदीराज यांनी सांगीतल्याप्रमाणे आवश्यक ते कागदपत्रे हस्तगत केल्यानंतर मी शनिवार दिनांक 03/10/2020 रोजी तलाठी श्री जे.पी. मुदीराज यांच्या दहेगाव (बोर), ता. वैजापूर येथील खाजगी तलाठी कार्यालयात गेलो. तेथे मला तलाठी श्री मुदीराज भेटले. त्यांनी माझ्याकडील वरीलप्रमाणे कागदपत्रे पाहिल्यानंतर मला तीन छापील फर्म दिले. त्यात 1) वारसा हक्काने नोंद घेवून सात बारा देणे बाबत अर्ज, 2) जाहिर प्रकटन व 3) पंचनामा इत्यादी कागदपत्रांचा समावेश होता. तलाठी श्री मुदीराज साहेब यांनी सदरचे तीन फर्म भरुन वरील कागदपत्रांसह मला मंगळवार दिनांक 06/10/2020 रोजी त्यांच्या दहेगाव (बोर), ता. वैजापूर येथील खाजगी तलाठी कार्यालयात बोलावले. तसेच असेही सांगीतले की, सदर वारस नोंद घेण्यासाठी तुम्हाला मला 5,000/- रुपये दयावे लागतील. जर तुम्ही मला 5000/- रुपये दिले नाहीत तर, तुमचे काम सहा महिने होणार नाही असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना नाईलाजाने हो म्हणून तेथून निघून आलो. तसेच दिनांक 05/10/2020 रोजी तलाठी श्री जे.के. मुदीराज यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे जावून लाच मागणीची तक्रार दिली. तेव्हा मला पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी सांगीतले की, उदया दि. 06/10/2020 रोजी सकाळी आम्ही दहेगाव जवळ येवू तुम्ही तेथे हजर रहा. त्यानंतर दिनांक 06/10/2020 रोजी सकाळी 10.30 वा. च्या सुमारास पोलीस निरीक्षक श्री महादेव

ढाकणे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद हे त्यांचा पोलीस स्टाफ तसेच दोन पंचांसह मौजे दहेगाव (बोर) ता. वैजापूर जवळील एका नियोजित सुरक्षित ठिकाणी येवून मला भेटले. तेथे त्यांनी त्यांची व त्यांच्या सोबतच्या स्टापची तसेच पंच क्र. 1) श्री संदीप आसाराम इंगळे, वय 38 वर्षे, व्यवसाय नोकरी, कायम मजुर, व पंच क्र. 2) श्री रवि खोब्राजी हातागळे, वय 32 वर्षे, व्यवसाय नोकरी, कृषी सहाय्यक, कृषी तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद यांची ओळख करुन दिली. तसेच माझी ओळख करुन घेतली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांच्या सुचनेवरुन मी माझी तक्रार पंचांसमक्ष पुन्हा सांगीतली. तेव्हा त्यांनी माझी दिनांक 05/10/2020 रोजी दिलेली तक्रार पडताळून पाहिली. त्यानंतर माझ्या दिनांक 05/10/2020 रोजीच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी सह्या केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. महादेव ढाकणे यांनी माझ्या व दोन्ही पंचाच्या संमतीने प्रस्तुत प्रकरणात पंचा समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन एक सोनी कंपनीचे व्हईस रेकर्डर दाखवून त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले. तसेच सदर व्हईस रेकर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये संभाषण रेकर्डीग होत असल्याचे सांगुन त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकले. तसेच सदर मेमरी कार्ड मध्ये अगोदरचे कोणतेही संभाषण नसल्याची माझी व दोन्ही पंचाना खात्री करुन देण्यात आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ढाकणे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईस अनुसरुन सर्वांना आवश्यक त्या सुचना दिल्या.त्यानंतर सापळा पथकातील कर्मचारी पोना. श्री. राठोड यांनी त्यांचेकडील व्हईस रेकर्डर सुरु करुन माझे अंगावर कोणास दिसणार नाही अशा अवस्थेत ठेवले. त्यानतर मी व पंच श्री संदीप इंगळे असे माझ्या कडील मोटार सायकलने सुरक्षित ठिकाणाहून सकाळी 11.20 वा. च्या सुमारास निघून दहेगाव (बोर) ता. वैजापूर येथील तलाठी श्री जे.के. मुदीराज यांच्या खाजगी कार्यालयात जाण्यासाठी निघालो. रस्त्यात तलाठी श्री मुदीराज हे मोटारसायकलने जातांना दिसले. तेव्हा तेथे थांबुन मी त्यांना माझ्या कामाबाबत बोलणे करु लागलो. तेव्हा त्यांनी मला सांगीतले की, मी लासुरला जात आहे. तुम्ही उदया या, मी तुमचे काम करुन देतो. त्यानंतर मी पंच श्री संदीप इंगळे यांच्यासह सापळा पथक थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आलो. त्यानंतर सदर प्रकरणी पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांच्या सुचनेप्रमाणे दिनांक 06/10/2020 रोजी पुन्हा लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानंतर आज दिनांक 07/10/2020 रोजी सकाळी 10.00 वा. पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे हे त्यांचा स्टाफ व वरील दोन पंचांसह काल ठरल्याप्रमाणे मौजे दहेगाव (बोर) ता. वैजापूर जवळील नियोजित सुरक्षित ठिकाणी येवून मला भेटले. तेथे त्यांनी मला पुन्हा सांगीतले की, दिनांक 06/10/2020 रोजी तलाठी श्री मुदिराज यांच्या भेटीदरम्यान लाचेच्या देण्या-घेण्या बाबत बोलणे झालेले नसल्याने लाचमागणी बाबत पुन्हा एकदा पडताळणी करावयाची आहे. त्यास मी तसेच दोन्ही पंचांनी संमती दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ढाकणे यांच्या सुचनेवरुन पोना. श्री राठोड यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकर्डरमध्ये एक नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझ्या अंगावर कोणास दिसणार नाही असा ठेवला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांच्या सुचनांप्रमाणे मी तसेच पंच क्र. 1 श्री संदीप इंगळे असे सकाळी 10.40 वा. च्या सुमारास सुरक्षित ठिकाणाहून निघून माझ्याकडील मोटारसायकलने तलाठी श्री जे.के. मुदीराज यांच्या दहेगाव, ता. वैजापूर येथील खाजगी कार्यालयात गेलो. तेथे माझी व तलाठी श्री मुदीराज यांची भेट झाली. तेव्हा मी त्यांच्याशी माझ्या कामा संदर्भात बोलणे केले. तेव्हा त्यांनी मला काम करतो असे सांगुन पुर्वी सांगीतल्याप्रमाणे 5000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना काहीतरी कमी करा अशी विनंती केली. तेव्हा तलाठी श्री मुदीराज यांनी माझ्या वारस नोंदीच्या कामासाठी माझ्याकडे तडजोडी अंती 3000/- रुपये लाचेची मागणी केली व सदर रक्कम लगेच त्यांच्या दहेगाव येथील कार्यालयात घेवून येण्याबाबत सांगीतले. तेव्हा मी त्यांना 15 मिनिटात येतो असे म्हणून पंच श्री संदिप इंगळे यांच्यासह सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 11.00 वा. च्या सुमारास परतआलो. तेथे श्री. पोना. श्री राठोड यांनी माझ्याकडील व्हईस रेकर्डर काढुन घेवुन बंद केले. त्यानंतर सदर व्हाईस रेकर्डरमध्ये रेकर्ड झालेले संभाषण मी तसेच पोलीस निरीक्षक श्री ढाकणे व दोन्ही पंचांनी ऐकले. त्यामध्ये श्री जे.के. मुदीराज, तलाठी यांनी लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी माझ्या व पंचांच्या संमतीने सदर प्रकरणी सापळा लावण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले व सापळा कारवाईसाठी आवश्यक त्या सुचना दिल्या. तसेच श्री जे.के. मुदीराज यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर माझ्या डोक्याला बांधलेला रुमाल डाव्या हाताने सोडून डाव्या खांदयावर ठेवून लाचेची रक्कम स्विकारल्या बाबत इशारा करण्याची सुचना मला दिली. तसेच मला, सापळा पथकातील स्टाफ तसेच पंचांना योग्य त्या सुचना दिल्या. सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या थ्रासीन पावडर लावलेल्या 3000/- च्या लाचेच्या नोटा माझ्या पन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवुन व्हईस रेकर्डर माझे अंगावर कोणास दिसणार नाही अशा अवस्थेत ठेवले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी दिलेल्या सुचनांनुसार मी व्हाईस रेकर्डरसह पंच श्री संदिप इंगळे यांच्यासोबत माझ्याकडील मोटारसायकलवर तसेच पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे, सापळा पथकातील कर्मचारी व पंच श्री रवि हातागळे असे शासकीय वाहनात बसुन 11.40 वा. रवाना झालो. दहेगाव येथील पेट्रोलपंपाच्या बाजुला पालखेड रोडवर दहेगाव शेड येथे आल्यानंतर तलाठी श्री जे.के. मुदीराज यांच्या कार्यालयात मी त्यांना भेटलो. तेव्हा मी त्यांना 3,000 /- रुपये आणले असल्याचे सांगीतले. तेव्हा त्यांनी सदर लाचेची रक्कम बाजुला उभ्या असलेल्या शिंदे नावाच्या इसमाकडे देण्यास सांगीतले. तेव्हा मी श्री जे.के. मुदीराज, तलाठी यांच्या सांगण्याप्रमामाणे सदरची लाच रक्कम माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशातून काढून सदर शिंदे नावाच्या इसमासमोर धरली असता त्यांनी लाचेची रक्कम त्यांच्या डाव्या हाताने स्वीकारुन स्वत:च्या पॅन्टच्या समोरील डाव्या खिशात ठेवली. तेव्हा मी सकाळी 11.55 वा. च्या सुमारास तलाठी कार्यालयाच्या बाहेर येवून माझ्या डोक्यास बांधलेला रुमाल डाव्या हाताने सोडून डाव्या खांदयावर ठेवून सापळा पथकास इशारा केला. त्यानंतर तात्काळ सापळा पथकाने पंच क्र. 2 श्री रवि हातागळे यांच्यासह घटनास्थळी दाखल होत श्री जे.के. मुदीराज, तलाठी, पालखेड सज्जा, ता. वैजापूर तसेच श्री प्रविण शिंदे, खाजगी इसम यांना पकडले. तसेच खाजगी इसम श्री प्रविण शिंदे यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत केली. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी त्यांचा परिचय करुन देत श्री जे.के. मुदीराज यांना त्यांचे नाव गाव विचारता त्यांनी त्यांचे नाव श्री जगदीश पुरुषोत्तम मुदीराज, वय 44 वर्षे, तलाठी, पालखेड सज्जा, ता. वैजापूर, रा. साई कलनी, गंगापूर रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद असे सांगीतले. तसेच श्री प्रविण शिंदे नावाच्या खाजगी इसमास त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री प्रविण नवनाथ शिंदे, वय 34 वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. प्रमिलाताई मंगल कार्यालयाच्या मागे, शिवराई रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद असे सांगीतले. त्यानंतर श्री प्रविण शिंदे यांच्या हातांची तसेच कपडयांची अल्ट्राव्हयेलेट लम्पच्या प्रकाशात तपासणी केली असता श्री प्रविण शिंदे यांच्या डाव्या हाताच्या पाचही बोटांचे पे-यावर व तळहातावर ठिकठिकाणी तसेच नेसत्या पॅन्टच्या समोरील डाव्या खिशाच्या तोंडावर व आतमध्ये ठिकठिकाणी थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच श्री प्रविण शिंदे यांच्या ताब्यातील लाचेच्या नोटा पंचांच्या समक्ष पडताळून पाहण्यात आल्या असता त्या सापळा कारवाईसाठी वापरण्यात आलेल्या नोटाच असल्याची खात्री झाली. तसेच सदर नोटांवर पंचांसमक्ष अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश टाकुन निरीक्षण केले असता त्यावर थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी श्री जे.के. मुदीराज, तलाठी यांच्याकडे माझ्या कुटूंबियांच्या वारस नोंदी बाबतच्या फाईलची चौकशी करुन सदरची फाईल त्यांच्याकडून ताब्यात घेवून जप्त केली.तरी आज दिनांक 07/10/2020 रोजी दुपारी 11.55 वा. च्या सुमारास दहेगाव (बोर) ता. वैजापूर येथील श्री जगदीश मुदीराज यांच्या खाजगी तलाठी कार्यालयात श्री जगदीश पुरुषोत्तम मुदीराज यांनी माझ्या स्वर्गीय वडीलांच्या नावे असलेल्या शेत जमिनीची वारसाच्या नावे नोंद करण्यासाठी माझ्याकडे तडजोडी अंती 3000 रुपये लाचेची मागणी करुन श्री प्रविण शिंदे यांचेमार्फत स्विकारली. म्हणून सदर दोघांविरुध्द विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आह

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Anant Mahipatrao Kulkarni(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अमलदार
पो.स्टे.वैजापूर

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Anant Mahipatrao Kulkarni
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**